

शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे

# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर द्वारा आयोजित

## दोन दिवसीय राष्ट्रीय पालि भाषा परिषद

# पालि साहित्त्यातील तत्त्वज्ञानाची आजच्या मानवाला आवश्यकता

## दि.२४ आणि २५ डिसेंबर २०२२

प्रति,

..........................................................................................................

..........................................................................................................

शिव छत्रपती शिक्षण संस्थेद्वारे १९७० साली स्थापीत झालेल्या राजर्षी शाहू (स्वायत्त) महाविद्यालयाने **लातूर पॅटर्न** या नावाने स्वतःची ओळख निर्माण केलेली आहे. महाविद्यालयाने १९८७ साली **पालि** भाषेच्या अध्यापनाला सुरुवात केली. आज महाविद्यालयात पालि भाषा अधिक विद्यार्थीप्रिय बनलेली आहे. पालि विभागाच्या वतीने अनेक राष्ट्रीय परिषदा, कार्यशाळा, चर्चासत्राचे आयोजन करण्यात येत असते. त्याचाच एक भाग म्हणून **पालि साहित्यातील तत्वज्ञानाची आजच्या मानवाला आवश्यकता** या विषयावर दिनांक २४ आणि २५ डिसेंबर २०२२ रोजी दोन दिवसीय राष्ट्रीय पालि भाषा परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

**परिषदेचा हेतू :-** मानवी जीवन सुखी, समाधानी, समृध्द आणि दुःखमुक्त व्हावे म्हणून तथागतांनी २५०० वर्षापुर्वी संपूर्ण विश्वाला प्रज्ञा, शील, करुणा, सदाचार, नैतिकता, स्व उध्दाराचा, अहिंसेचा, न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधूता, राष्ट्रीय एकात्मतेचा, बहूजन हिताय  बहूजन सुखायचा उपदेश दिला आहे. बुध्दकालीन व बुध्दोत्तर राजे-महाराजे, प्रजा यांनी त्यानुसार आचरण केले. त्यामूळे भारतात सर्वत्र शांतता व सुव्यवस्था निर्माण होऊन भारत देश तत्काळात प्रगतीपथावर होता, म्हणूनच भारताला **सोनेकी चिडिया** म्हणत होते. नंतरच्या काळात स्वकीय आणि परकीय आक्रमणामूळे व त्यांच्या दुष्ट प्रवृत्तीमूळे, चैत्य, स्तूप, स्तंभ, लेणी, विहारे, विद्यापीठे, ग्रंथालये, विद्वान, आचार्य, बुध्द तत्त्वज्ञानाचे प्रचारक, पालि भाषा व साहित्य हे सर्व काही लोप झाले होते. तद्नंतर आधुनिक काळात देश-विदेशातील अभ्यासक आणि ब्रिटीश संशोधकांनी पालि भाषा व बौध्द संस्कृतीचे पुनरुज्जीवन केले. अनेक ठिकाणच्या प्राचीन बौध्द स्थळांचे उत्खनन करुन ते जगासमोर आणले आजही ते कार्य चालूच आहे.

आजच्या मानवाने बुध्दांच्या उपदेशाप्रमाणे आचरण केले तर तो स्वतः समृध्द सुखी होऊन संपूर्ण विश्वात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापीत होण्यास मदत होते. परिणामी भारताचे गतवैभव पुन्हा जगासमोर येऊन भारत देश ख-या अर्थाने ज्ञान व विज्ञानाच्या क्षेत्रात विश्वगुरु बनू शकतो. आज विश्वाला युध्दाची नव्हे तर बुध्दांच्या विचारांची गरज आहे. ही या राष्ट्रीय पालि भाषा परिषदेची उपलब्धी आहे. म्हणून **पालि साहित्यातील तत्त्वज्ञानाची आजच्या मानवाला आवश्यकता.** या विषयावर दोन दिवशीय राष्ट्रीय पालि परिषद आयोजित केली आहे.

**परिषदेचे उपविषय :-**

1. पालि साहित्यातील तत्वज्ञान आणि आजचा मानव.
2. तथागतांचा दुःख मुक्तीचा सिध्दांत.
3. तथागतांचा कार्य - कारणभाव सिध्दांत.
4. पालि साहित्यातून मानवी उत्कर्ष : एक चिकित्सक अभ्यास.
5. धम्मपदातील तत्वज्ञानाचा मानवी सामाजावर प्रभाव.
6. थेरी गाथेतील तत्तवज्ञानाचा स्त्रीजीवनावर प्रभाव.
7. शिल्प व लेणीतील संसकृतीचा आजच्या समाज जीवनावर प्रभाव.
8. तथागतांच्या मध्यम मार्गाची आजच्या मानवाला आवश्यकता.
9. तथागतांच्या अनात्मवादाची आजच्या मानवाला गरज.
10. सुत्तनिपातातील तत्त्वज्ञानाचा मानवी समाजावर प्रभाव.
11. विपस्सना साधना एक महत्वपूर्ण जीवन मार्ग.
12. विपस्सना : शंका-समाधन.
13. दुःख-अनित्य-अनात्म या तत्त्वाचा चिकित्सक अभ्यास.
14. विश्वात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी पंचशीलाची आवश्यकता.
15. आधुनिक विद्वानावर पालि साहित्यातील तत्त्वज्ञानाचा प्रभाव.
16. पुनर्भवः सिध्दांताचा चिकित्सक अभ्यास.
17. पालि साहित्यातील तत्त्वाचा भारतीय संविधानावर प्रभाव.

वरीलपैकी कोणत्याही एका विषयावर 2000 ते 2500 शब्दात आपला शोध निबंध दि. 10 डिसेंबर 2022 पर्यंत पाठवावे. पालि, मराठी आणि हिंदीसाठी Kruti Dev 010 साईज 14 इंग्रजी - Times New Roman साईज 12 या फॉन्ट मध्ये Words आणि PDF स्वरुपात या इमेलवर पाठवावे paliparishadlatur@gmail.com संपर्क - 9028694891 / 9970985811/ 9850796755 नोंदणी फिस 1000 रुपये.


सह-आयोजक
**प्रा.डॉ. सुरेश सोनोने**
पालि विभाग प्रमुख
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

सह-आयोजक
**प्रा. सदाशीव शिंदे**
उप प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

आयोजक
**डॉ. महादेव गव्हाणे**
प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

सह-आयोजक
**डॉ. भीमराव पाटील**
पालि विभाग
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर